दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | शुक्रवार दि.१२ डिसेंबर २०२५ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक ११० | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Friday 12 December 2025 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 110 | Pages 4 | Rate 4 Rs







# लाडक्या बहिणीवरुन सभागृहात खडाजंगी

## विरोधकांचा सभात्याग योग्यवेळी देणार २१०० रूपये-एकनाथ शिंदे



**नागपुर । प्रतिनिधी –राज्यात सुरू असलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राज्य सरकारची एक लोकप्रिय योजना आहे. मात्र या योजनेत १२ हजार ४३१ पुरूषांनी १३ महिने १५०० रूपयांचा लाभ घेतला.यामध्ये १६४ कोटी रूपायांचा घोटाळा झाल्याची बाब उघड झाली. यावर शासनाने कोणतीही कारवाई केली नाही. याकडे विरोधकांनी सभागृहाचे लक्ष वेधले. यावर उत्तरा दाखल बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकावर टिका करीत लाडक्या बहिणींनी तुमचा टांगा पलटी केला. तर योग्य वेळ आल्यावर आम्ही लाडक्या बहिणीला २१०० रूपये देणार अशी घोषणा केली. निवडणूकीच्या तोंडावर लाडक्या बहिणींना १५०० रूपये देण्याची योजना सरकारने सुरू केली. त्यावेळी सरकारने २१ ते ६५ वयोगटातील सर्व महिलांना दरमहा १५०० रूपये देण्याची घोषणी केली त्याप्रमाणे १३ महिने वाटपही झाले. सरसकट पैले देण्यात आल्याने या योजनेत १२ हजार ४३१ पुरूषांनी लाभ घेतला. सरसकट पैसे देण्याची घोषणा केली मग आता अटी व शर्ती का लावण्यात आल्या असा सवाल जयंत पाटील यांनी केला. त्यावर महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे यांनी लाडक्या बहिणींना नाव नोंदणी करण्यासाठी पोर्टल उपलब्ध करून देण्यात आले होते. तसेच ऑफलाईन पद्धतीनेही नाव नोंदणी करण्याची सोय उपलब्ध करून दिली होती. त्यामुळे कोणताही वाद निर्माण करण्याचा प्रयत्न करू नये, असे सांगत यात वाद नको अले आवाहन केले.**

काँग्रेसचे नाना पटोले यांनी या योडनेत मोठा घोळ झालेला आहे. आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक यांना कामाला लावले आहे. त्यांना टार्गेट देण्यात आले. अमुक-अमुक फॉर्म भरून झालेच पाहिजेत, असे त्यांना सांगण्यात आले. त्यानंतर या कर्मचाऱ्यांनी अनेक ठिकाणी बोगस फॉर्म भरले आहेत. या योजनेत मोठी गडबड झालेली आहे. या गडबडीला कोण जबाबदार आहे. या योजनेसाठी वापरण्यात आलेले पैसे हे सरकार मध्ये बसलेल्यांचे नाहीत. सत्तेत बसलेले मालक नाहीत. जनतेच्या पैशांचा हिशोब द्यावा लागेल, असा थेट सवाल नाना पटोले यांनी विचारला. यावर उत्तर देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नाना पटोलेंना लक्ष्य केले. तुम्ही लाडकी बहीण योजनेवर बोलून नये. या योजनेला तुम्ही विरोध केला होता. म्हणूनच विधानसभा निवडणुकीत तुमचा पराभव झाला. लाडक्या बहिणीमुळे तुमचा टांगा पलटी केला असा पलटवार करीत शिंदे यांनी आता आणखी तुम्ही या योजनेला विरोधच करत असाल तर भविष्यातही लाडक्या बहिणी तुम्हाला घरी बसवतील, असा हल्लाबोल केला. लाडक्या बहिणींना २१०० रूपये कधी पासून देणार या प्रश्नावर शिंदे यांनी योग्य वेळ आली की आम्ही लाडक्या बहिणींना २१०० रुपयांचा लाभही देऊ, असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सभागृहात केली. योजनेअंतर्गत लाभार्थी महिलांना प्रत्येक महिन्याला १५०० रुपयांची आर्थिक मदत केली जाते. सध्या पात्र महिलांकडून केवायसी प्रक्रिया करून घेतली जात आहे. या प्रक्रियेदरम्यान महिलांना अनेक अडचणी येत आहेत. दुसरीकडे नियमांचे उल्लंघन करून लाभ घेणाऱ्या अनेक लाडक्या बहिणींची नावे लाभार्थी यादीतून वगळण्यात आली आहे. या सर्व मुद्द्यांवर आज सभागृहात मोठी खडाजंगी झाली. विरोधकांनी या योजनेत मोठा घोळ झाला आहे, असा गंभीर आरोप करत महिलांना २१०० रुपयांची वाढीव मदत कधी देणार असे विचारले तर सत्ताधाऱ्यांनी विरोधकांचे आरोप खोडून काढले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तर लाडक्या बहिणींसाठी सभागृहात मोठी घोषणा केली.




# समीर सलीम सय्यद यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेस (श प) तालुका उपाध्यक्ष पदी निवड

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । दर्शन डोंगरे**

शहरातील आझाद नगर येथील रहिवासी तथा सामाजिक कार्यकर्ते सलीम बापू यांचे चिरंजीव समीर सलीम सय्यद यांची माजलगाव तालुका युवक काँग्रेस (शरद पवार) च्या तालुका उपाध्यक्ष पदी निवड झाल्याचे पत्र त्यांना काल येथील जेष्ठ नेते मोहनराव जागताप यांच्या प्रमुख उपस्थित देण्यात आले.काल दि ११ रोजी सकाळी ११ वा येथील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयात अनेक मानीवरांच्या उपस्थितीत एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या समीर सलीम सय्यद रा. आझाद नगर राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टी-शरदचंद्रजी पवार साहेब युवक काँग्रेस च्या तालुकाउपाध्यक्ष पदी निवड करण्यात येत आहे. या पदाच्या माध्यमातुन देशाचे नेते शरदचंद्रजी पवार साहेब व युवक कॉग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मा. महेबुब शेख व बीड जिल्ह्याचे



खासदार मा. बजरंगबप्पा सोनवणे व माजलगांव मतदार संघाचे नेते मा. मोहनदादा जगताप साहेब यांचे पुरोगामी विचार तळागळा पर्यंत पोहचुन पक्ष बळकट कराल हिच अपेक्षा.या आशयाचे पत्र सय्यद समीर सलीम याना देण्यात आले राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटाने जी माझ्यावर तालुका युवक काँग्रेस च्या तालुका उपाध्यक्ष पदाची जी जबाबदारी टाकली आहे त्या बद्दल सर्व जेष्ठ नेत्यांचे आभार व्यक्त करून पक्ष बळकटी साठी मी सर्वतोपरी प्रयत्न करून अहोरात्र जण कल्यानासाठी सदैव तत्पर राहील समीर यांची शहरातून विशेषता तरुणातून त्यांची क्रेझ आहे खूप मोठी युवकांची फळी त्यांनी आपल्या सामाजिक कार्यातून उभी केली आहे समीर यांच्या मुळे भविष्यात पक्षाला मोठी बळकटी मिळणार आहे समीर भैया यांच्या निवडी बद्दल सय्यद रईस कादरी ,शेख इलियास ,महमूद बेग,इस्माईल मोमीन ,सय्यद रफिक ,शेख इमरान ,शेख जुबेर ,सय्यद तोफिक ,शेख सलीम ,सय्यद शाहबाज,बप्पा डोंगरे,शेख अरबाज,शेख बाबा व समीर सिद्दीकी यांनी त्यांना शुभेच्छा दिल्य.

# ब्रेक फेल झाल्याने कोंडाईबारी घाटात ट्रकची कंटेनरला भीषण धडक

## तिघे किरकोळ जखमी, मोठी जीवितहानी टळली!

दैनिक वादळ वार्ता

**मोहसीन शेख । विसरवाडी**

धुळे-सुरत राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वर कोंडाईबारी घाटात रविवारी (१० डिसेंबर) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास ब्रेक निकामी झाल्याने तांदळाने भरलेल्या ट्रकला भीषण अपघात झाला. रायपूरहून मोरबीकडे जाणारा हा ट्रक नियंत्रण सुटल्यामुळे कंटेनरला जोरदार धडकला आणि त्यानंतर ३० ते ४० मीटर घसरत रस्त्याच्या विरुद्ध बाजूस पलटी झाला.ट्रक क्रमांक (जिजे हीव्ही ९४२१) चे ब्रेक अचानक निकामी झाले आणि अनियंत्रित ट्रकरने पुढे जात असलेल्या कंटेनरला (एम ४३ बी एक्स २३७५) धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी मोठी होती



की ट्रक पलटी झाला आणि त्याचे मोठे नुकसान झाले. अपघातामध्ये कागोन अजय मोरे, प्रमेश रामावत आणि सुनील इस्तारिया हे तिघे किरकोळ जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच नॅशनल हायवे रुग्णवाहिका तातडीने घटनास्थळी दाखल झाली. डॉक्टर रवींद्र वळवी, हेल्पर सोमनाथ नाईक, आणि पायलट अजय गावित यांनी जखमींना त्वरित प्राथमिक उपचार पुरवून सुरक्षित स्थळी हलवले. अपघाताच्या वेळी विसरवाडीहून दहीवेलकडे जाणारे अन्य वाहन समोर आले असते, तर परिस्थिती खूप गंभीर होऊन जीवितहानी होण्याची शक्यता होती. सुदैवाने तसे झाले नाही.

राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणानंतर कोंडाईबारी घाटात अपघातांचे प्रमाण वाढल्याची चिंता नागरिक व्यक्त करत आहेत. चौपदरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे का, किंवा तांत्रिक बाबींकडे दुर्लक्ष झाले आहे का, याबाबत नागरिकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

# नंदुरबारच्या स्वप्नपूर्तीला मुहूर्त! १६० कोटींच्या कोळदा विसरवाडी राष्ट्रीय महामार्गासाठी कार्यारंभ आदेश जारी

## खासदार गोवाल पाडवींच्या पाठपुराव्याला मोठं यश; जिल्ह्याच्या विकासाचा मार्ग मोकळा!

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्ह्याचे भाग्य बदलवणारा आणि अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला महत्त्वाकांक्षी प्रकल्प अखेर सत्यात उतरत आहे. कोळदा-नंदुरबार-विसरवाडी ( एन एच ७५२जी) राष्ट्रीय महामार्गासाठी भारत सरकारने अधिकृतपणे कार्यारंभ आदेश जारी केला आहे. दिल्ली दरबारात सातत्याने आवाज उठवणाऱ्या आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी साहेबांकडे अथक पाठपुरावा करणाऱ्या खासदार गोवाल पाडवी यांच्या प्रयत्नांना हे मोठे यश मिळाले आहे.या ऐतिहासिक प्रकल्पासाठी तब्बल १६०कोटी रुपयांच्या निधीतून आता प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे. हा केवळ रस्ता नाही, तर नंदुरबारच्या विकासाची, प्रगतीची आणि वेगाची नवी दिशा ठरणार आहे.

जनतेच्या भावना आणि जिल्ह्याची गरज



ओळखून खासदार पाडवी यांनी हा प्रकल्प मार्गी लावण्यासाठी जीवाचे रान केले. त्यांच्या तळमळीचा पाठपुरावा फळला असून, येत्या दोन वर्षांत हा ४४ किलोमीटरचा महामार्ग १० मीटर रुंद होणार आहे.

**प्रकल्पातील मुख्य वैशिष्ट्ये**

दोन मोठे पूल आणि १४ लहान पूल बांधले जातील.४४ आधुनिक बॉक्स टाईप पूल. अत्याधुनिक मानकांप्रमाणे दर्जेदार डांबरीकरण करण्यात येणार आहे. या विकासामुळे नंदुरबार, कोळदा, विसरवाडी परिसरातील व्यापार, आरोग्यसेवा, कृषीमाल वाहतूक आणि विद्यार्थ्यांचे जीवन अधिक सुकर होणार आहे. ग्रामीण भागातील नागरिकांचा प्रवास सुरक्षित, सुखकर आणि वेगवान होईल.

**नंदुरबार-तळोदा-अक्कलकुवा मार्गालाही गती**

याचसोबत, नंदुरबार जिल्ह्याच्या उत्तर भागाच्या औद्योगिक आणि सामाजिक विकासाला गती देणारा दुसरा महत्त्वाकांक्षी प्रकल्प- नंदुरबार-तळोदा-अक्कलकुवा या ४ पदरी महामार्गाच्या कामालाही लवकरच सुरुवात होणार आहे. या मार्गाच्या भूमी अधिग्रहणाची प्रक्रिया सध्या अंतिम टप्प्यात असून, खासदार पाडवी यांच्या नेतृत्वाखाली हा मार्गही लवकरच मार्गी लागेल.

खासदार गोवाल पाडवी यांनी एकाच वेळी दोन महत्त्वाकांक्षी महामार्ग प्रकल्पांना गती देऊन नंदुरबार जिल्ह्याच्या विकासात नवा सुवर्णकाळ आणला आहे.

# दारू दुकानांच्या स्थलांतरासाठी सोसायटीची एनओसी बंधनकारक उपमुख्यमंत्री अजित पवार

दैनिक वादळ वार्ता

**नागपुर । प्रतिनिधी**

राज्यात एफ.एल-२ आणि सी.एल-३ परवानाधारक विदेशी व देशी दारू किरकोळ विक्री केंद्रांच्या स्थलांतरासाठी नोंदणीकृत सोसायटीची एनओसी अनिवार्य करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असल्याची माहिती उपमुख्यमंत्री व उत्पादन शुल्क मंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिली.सदस्य शंकर जगताप यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते.

पवार म्हणाले की, संबंधित दुकान सोसायटी परिसरात असेल तर सोसायटीची संमती नसल्यास स्थलांतरास कोणतीही परवानगी दिली जाणार नाही. एफएल-२ आणि सीएल-३ परवान्यांबाबत ही अट आता काटेकोरपणे लागू राहील. पिंपरी-चिंचवड येथील कोळीवाडा आणि रहाटणीतील दोन अनधिकृत दारू दुकाने निलंबित करण्यात आल्याचेही उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले. यापैकी एक प्रकरण न्यायालयात प्रलंबित असून उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कारवाई केली जाईल, तर एका दुकानावर यापूर्वी रुपये ५०,००० दंड आकारण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



संपादकीय

# नाईट ऑफ फायर डे ऑफ शेम!



एरवी गोवा हे तसे शांत राज्य. तिथे गुन्हेगारीचे प्रमाण कमी आहे. अर्थात अगदी उत्तर प्रदेश किवा बिहारसारखी परिस्थिती नाही. पण तिथे क्लब संस्कृती रुजली आहे. या क्लब संस्कृतीत तल्लीन झालेले २५ जण या क्लबमध्ये जीवनाचा आनंद घेत असतानाच मृत्युमुखी पडले. ही घटना घडल्यानंतर आता या क्लबच्या उभारणीत अनेक गोष्टी समोर येत आहेत. या संपूर्ण घटनेला जबाबदार आहेत ती गोव्यातील भ्रष्टाचार आणि बेकायदा बांधकामे आणि त्यात बरबटलेले अनेकांचे हात. बर्च या उत्तर गोव्यातील लोकप्रिय क्लबमध्ये शनिवारी झालेल्या आगीच्या दुर्घटनेत २५ जण होरपळून ठार झाले. बेली डान्स चालू असताना हा प्रकार घडला आणि पहिला मजला आगीने संपूर्ण वेढला गेला. हा क्लब मिठागराच्या जमिनीवर बांधला होता आणि त्याच्यातून येण्या-जाण्यासाठी फारच चिंचोळा मार्ग होता. त्यामुळे डीजे सुरू असताना १५० लोक त्या अरुंद जागेत जमले होते आणि नंतर नृत्यांगनांनी हातात मेणबत्त्या घेऊन नाच सुरू केला आणि तेच खरे कारण होते असे सांगण्यात आले. हे तात्कालिक कारण झाले. नाच सुरू असताना फटाकेही फोडले जात होते. त्यामुळे आगीच्या ज्वाळांत लाकडी सिलिंग सापडले आणि आगीचा भडका उडाला. काही लोक खालच्या मजल्याकडे धावले; परंतु बेसमेंट किचनची जागा अरुंद असल्यामुळे २३ लोक गुदमरून मरण पावले. दोन जळालेले मृतदेह नंतर जिन्यावर सापडले. मुळात हा क्लब अत्यंत अरुंद जागेत होता आणि ही दुर्घटना घडण्यास खरे कारण आहे ते क्लब मालकाची अनिवार भूक आणि सगळे नियम धाब्यावर बसवून केलेली कामे. क्लबचा मालक सौरभ आणि गौरव लुथरा हे आहेत.गोव्यात झालेल्या या अग्नितांडवानंतर सर्वत्र शांतता होती. गोवा हे पर्यटन राज्य म्हणून विकसित आहे. तेथील अर्थव्यवस्थाही पर्यटनावरच चालते. पण ७ डिसेंबर हा दिवस गोव्याच्या पर्यटनाच्या इतिहासात काळा दिवस म्हणून गणला जाईल. जे लोक गोव्यात नव वर्ष साजरे करण्यासाठी येतात त्यांच्यावर आपल्या प्रियजनांसाठी शवपेटिका घेऊन जाण्याची वेळ आली. अनेक वर्षांपासून गोव्यातील नाईट लाईफ आणि क्बब संस्कृतीबद्दल आवाज उठवले जात आहेत. तेथे अनेकांना या नाईट लाईफचा मोह होतो आणि परिणामी दुर्घटना घडून त्यांचे जीव जातात. कालची घटना अशीच म्हणावी लागेल. एक तर गोव्यात बेकायदा बांधकामांवर कुणीही राजकीय नेता आळा घालू शकत नाही. गोव्यातील जो बीच साइडचा पट्टा आहे तो बेकायदेशीर आहे आणि त्याविरोधात सातत्याने आवाज उठवला तरीही राजकीय पक्ष त्याविरोधात कुणालाही कारवाई करू देत नाहीत. गेली अनेक वर्षे गोवा बेकायदेशीर बांधकामे, परवानाविरहित शॅक्स आणि नाईट क्लब्ज यांच्याशी लढत देत आहे. आगीच्या नियमांची पायमल्ली हे तर गोव्यातील रोजचे जीवन झाले आहे. या क्लबलाही फायर सेफ्टी नव्हती. त्यामुळे आग लागली, त्यात २५ जणांचे नाहक बळी गेले आणि येथील बेसमेंट तर पैसा आणि त्याच्या जोरावर राजकीय संरक्षण आणि नोकरशाहीचे वरदान यामुळे कायद्याचे राज्य पायाखाली तुडवले गेले आहे. त्यातून अशा अनेक दुर्घटना घडल्या आहेत. प्रत्येकवेळी नोकरशाही आगीपासून सुरक्षा यंत्रणा पुरवण्यात अपयशी ठरते आणि तरीही दुर्घटना घडली. सारे काही आलबेल होते. त्यामुळे बेसमेंट तर मृत्यूचे सापळे झाले आहेत.गोव्याच्या जीवनशैलीचा इथे गैरफायदा घेण्याची वृत्ती दिसून येते. गोव्यातील आगीची दुर्घटना ही केवळ प्रशासनाचे अपयश म्हणून पाहता येणार नाही, तर परवाने नसतानाही अशा क्लबमधून पैसा कमावण्याची भूक आहे. त्यामुळे २५ जणांचे हकनाक बळी गेले तरीही कुणालाही फारसा फरक पडणार नाही. आता अशी धक्कायदायक माहिती समोर आली आहे, की या क्लबला सेफ्टी क्लिअरन्स नव्हते. प्राथमिक सेफ्टी नॉर्म्स म्हणजे सुरक्षाविषयक निकषाचे पालनही करण्यात आले नाही. गोवा हे पर्यटन राज्य आहे आणि त्यामुळे येथे प्रत्येक पर्यटकांचा सन्मान झाला पाहिजे. पण नोकरशाही आणि क्लब मालकांची बेपर्वाई यामुळे लोकांचे जीव असुरक्षित आहेत. कालची दुर्घटना ही प्रशासकीय अपयशाचे आणि सेफ्टी नॉर्म्स म्हणजे सुरक्षेचे निकष पालन न करता मिळवलेले परवाने आणि त्यातून प्रशासनाची झालेली चांदी यांचे उदाहरण ठरावे. अधिकाऱ्यांनी असे सांगितले आहे, की त्यांना या क्लबकडे सुरक्षा निकषांची कमतरता आहे याची कल्पनाही नव्हती. ते खोटे बोलत आहेत किंवा त्यांना प्रसासकीय अपयशाची कल्पनाच नव्हती. सरकारने काही अधिकाऱ्यांना निलंबित केले आहे आणि तातडीची मदत देऊ केली आहे. ते तर झालेच पण खरा प्रश्न हा आहे, की गोव्यातील प्रशासनाला स्वत:च्या जबाबदारीची जाणीव कधी होणार आणि कधी निरपराध लोकांचे जीव जाण्याचे थांबणार. या दुर्घटनेची व्याप्ती पाहता आता यात सरकारने ठोस काहीतरी करण्याची अपेक्षा आहे. गोव्यात राजकीय पक्ष नेहमीप्रमाणे राजकारणात गुंतले आहेत आणि त्यांच्यात भाजपविरोधात आग ओकणे सुरू झाले आहे, पण एक राजकीय पक्ष यास जबाबदार नाहीत तर येथील व्यवस्था आणि वर्षानुवर्षे चाललेले कुप्रशासन यास जबाबदार आहे. गोव्यात ऐन पर्यटन हंगामात ही दुर्घटना घडल्याने अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम होण्याची शक्यता आहे. कारण हाच हंगाम गोव्यातील पर्यटनाला खऱ्या अर्थाने बहर येतो. त्याच काळात ही दुर्घटना घडल्याने गोव्याच्याच नाही तर भारताच्याच एकूण अर्थव्यवस्थेवर याचा परिणाम होणार आहे.

# जिममधून,डाएटिंगमधून नाही,अतिरिक्त काम न करताही वजन कमी केले जाऊ शकते

तुम्हाला वजन कमी करायचे असेल तर ही बातमी आधी वाचा. वजन वाढणे अपरिहार्य आहे, परंतु जिममध्ये न जाता आणि जास्त आहारावर नियंत्रण न ठेवता वजन नियंत्रित केले जाऊ शकते. आजकाल ह्याला नॉन-एक्सरसाइज ॲक्टिव्हिटी थर्मोजेनेसिस एनईईटी म्हटले जाते . यासह, आपण हळूहळू वजन देखील कमी करू शकता.

**NEET म्हणजे काय?**

व्यायाम न करता थर्मोजेनेसिस म्हणजे व्यायामाशिवाय हालचाल. म्हणजे व्यायाम न करता तुम्हाला तुमची हालचाल थोडी वाढवावी लागेल. उदाहरणार्थ, आपण सकाळी अंथरुणातून बाहेर पडता. आता ५ मिनिटे स्ट्रेचिंग करा. यानंतर थोडा वेळ फेरफटका मारा. घरातील वैयक्तिक कामातून मोकळीक मिळाली तर फरशी थोडी स्वच्छ करा. मला जरासा झाडू दे, असं म्हणा आणि पंखा कधीतरी स्वच्छ करा. कधी भिंत स्वच्छ करावी, कधी भांडी स्वच्छ करावीत, कधी पुस्तकं बाहेर काढून स्वच्छ करून योग्य पद्धतीने ठेवायची आहे. घरातील सर्व विखुरलेल्या वस्तू योग्य ठिकाणी ठेवा. जेव्हा तुम्ही बराच वेळ बसून असाल तेव्हा थोडावेळ तिथे उभे रहा. जर तुम्ही ऑफिसमध्ये काम करत असाल तर अर्ध्या तासानंतर फेरफटका मारा. ऑफिसमध्ये पायऱ्यांचा भरपूर वापर करा. जेव्हा संधी मिळेल तेव्हा पायऱ्या चढा . हे सर्व तुम्हाला व्यायामासारखे वाटणार नाही, परंतु एक



प्रकारे ते एक व्यायामाचे काम करेल. जरी ते जास्त कॅलरी घेत नसले तरीही यामुळे वजन कमी होऊ शकते. म्हणजेच, दर अर्ध्या तासाला तुम्हाला तुमच्या शरीरात काही हालचाली करत राहाव्या लागतात.

**हिवाळ्यात वजन कसे कमी करावे?**

१. अशा प्रकारे चालणे वाढले आहे - चालणे कमी केले आहे. प्रत्येक ठिकाणी वाहनाने जातात. अशा परिस्थितीत ऑनलाइन खरेदी करण्याऐवजी स्टोअर किंवा मॉल्समध्ये खरेदी करा. यामुळे चालणे वाढेल. जेव्हा आपण कॉल करत असाल तेव्हा जाता जाता बोला. विचार करत असताना फिरायला जा, उद्यानात जा, पायऱ्यांचा वापर करा, दात घासून घ्या किंवा स्वयंपाक करताना एकाच ठिकाणी चाला. छोट्या छोट्या हालचाली मोठ्या होतात.

२. कामाच्या ठिकाणी हालचाली वाढवा - तुम्ही जिथे काम करता तिथे तुमचे उपक्रम वाढवा. वॉकिंग पॅड, स्टँडिंग डेस्क, लहान इनडोअर वॉक आणि आपल्या कार्यक्षेत्रात फिरणे हे सर्व सहजतेने हालचाली वाढविण्याचे मार्ग आहेत. कमीतकमी ५-१० मिनिटे चाला किंवा उभे रहा. दिवसभरात, या छोट्या नियमित हालचाली एकत्रितपणे बर्याच कॅलरी बर्न करतात.

३. फिजिंगचा फायदा घ्या - अनवधानाने हालचाली केल्याने नीट वाढ होते. जसे की आपण बसले असताना, आपले पाय हलवा, आपल्या बोटांनी टेबलवर टॅप करा, आपल्या पायाची बोटे हलवा, आपले खांदे किंवा घोटे फिरवा, एका बाजूने दुसऱ्या बाजूला स्विंग करा, स्ट्रेस बॉल दाबा. या सर्व गोष्टींचा उद्देश स्वतःला स्थिर ठेवणे नाही, नेहमी स्वतःला काही कार्यात गुंतवून ठेवणे आहे.

४. घरातील कामे वाढवा - साफसफाई करणे, घासणे, भांडी घासणे, झाडू मारणे, वाकणे, हात पुढे करणे, कपडे वाळवायला देणे, ही सर्व कामे स्वच्छ वाढविणारी कामे आहेत आणि कॅलरी बर्न करतात.

५. दैनंदिन कामांमध्ये लहान बदल करा - अगदी लहान प्रयत्न देखील आपल्या एनईईटी चळवळीला वाढवते. उदाहरणार्थ, गोष्टी आयोजित करताना अनेक फेऱ्या घ्या, कपडे धुताना अधिक हालचाल करा, डिशवॉशरमध्ये ठेवण्यापूर्वी काही भांडी हाताने धुवा किंवा कधीकधी फर्निचर काढून पाठ स्वच्छ करा. हे सर्व असूनही, एक गोष्ट लक्षात ठेवा की NEET प्रभावी आहे, परंतु तो व्यायामाचा पर्याय नाही.

# काळे डाग असलेला कांदा आरोग्यासाठी घातक?

कांद्याचा वापर भाजी बनवण्यासाठी आणि ग्रेव्ही तयार करण्यासाठी आणि बर्याच पदार्थांमध्ये चव जोडण्यासाठी मसाला म्हणून केला जातो. आरोग्याच्या दृष्टिकोनातून हे खाण्याचे बरेच फायदे आहेत, कारण त्यात व्हिटॅमिन सी, फायबर आणि अँटीऑक्सिडेंट्स असतात. हे पोषक हृदयाच्या आरोग्यास आणि रक्त नियमनास समर्थन देण्यासाठी कार्य करतात. पण कांदे खाताना ही छोटीशी चूक तुमच्या मूत्रपिंडाला देखील नुकसान पोहोचवू शकते. बर् याच काळापासून साठवलेल्या कांद्यावर बर् याचदा काळ्या रेषा किंवा डाग दिसतात. जरी हे डाग पाण्याने धुतल्यावर अनेकदा अस्पष्ट होतात, परंतु तरीही ते खाऊन टाळले पाहिजेत. कारण ते एक प्रकारचे विष आहे. कांदा हा आपल्या दैनंदिन स्वयंपाकातील महत्त्वाचा घटक असून त्याचे औषधी, पोषणात्मक आणि आरोग्यदायी फायदे खूप आहेत.भारतीय स्वयंपाकात कांद्याचा वापर भाज्या, उसळी, आमटी, कोशिंबीर तसेच चटण्यांमध्ये मोठ्या प्रमाणात केला जातो. कांद्यात व्हिटॅमिन ३, व्हिटॅमिन इ६, फायबर, अँटीऑक्सिडंट्स आणि सल्फर संयुगे आढळतात. त्यामुळे तो रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास मदत करतो. कच्चा कांदा खाल्ल्याने पचनशक्ती सुधारते, भूक वाढते आणि आतड्यांची स्वच्छता होते. बद्धकोष्ठतेवरसुद्धा कांदा उपयोगी ठरतो. कांदा हृदयासाठी फायदेशीर आहे. तो कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करतो आणि रक्ताभिसरण सुधारतो. त्यामुळे रक्तदाब नियंत्रित राहतो व हृदयविकाराचा धोका कमी होतो. मधुमेहींसाठीही कांदा उपयुक्त मानला जातो, कारण तो रक्तातील साखरेची पातळी



संतुलित ठेवतो. कांद्याचे घरगुती उपाय देखील प्रसिद्ध आहेत. कांद्याचा रस केसगळती कमी करण्यासाठी वापरला जातो. तो टाळूतील रक्तप्रवाह वाढवून केसांच्या मुळांना बळकट करतो. मध आणि कांद्याचा रस एकत्र केल्यास खोकला आणि सर्दीवर आराम मिळतो. कीटक चावल्यास कांद्याचा रस लावल्याने सूज आणि वेदना कमी होतात.


उन्हाळ्यात कांदा खाल्ल्याने शरीर थंड राहते आणि उष्माघातापासून संरक्षण मिळते. मात्र कांदा अति प्रमाणात खाल्ल्यास आम्लपित्त किंवा पोटदुखी होऊ शकते, त्यामुळे तो मर्यादेत आणि योग्य प्रकारे वापरणे आवश्यक आहे. कांदा हा स्वस्त, सहज उपलब्ध आणि अत्यंत गुणकारी असा आहारातील घटक आहे. कांद्यावरील काळे डाग हा एक प्रकारचा बुरशी आहे जो ॲस्परगिलस नायजर नावाच्या बुरशीमुळे होतो, जो मातीत आढळणारा एक सामान्य बुरशी आहे. पण खाण्यापासून ते टाळले पाहिजे. या गटाचे काही ताण, ज्याला एस्परगिलस सेक्शन निग्री म्हणतात, मायकोटॉक्सिन ऑक्रॅटॉक्सिन ए तयार करतात, जे मूत्रपिंड आणि यकृत खराब करण्यासाठी ओळखले जाते.सर्व ब्लॅक स्पॉटेड कांद्यामध्ये हे विष नसले तरी असे कांदे खाऊ नयेत याची काळजी घेणे आवश्यक आहे. यासाठी संपूर्ण कांदा फेकून देण्याची गरज नाही, फक्त तो थर काढून वेगळा करावा. कांदे साठवण्याची योग्य पद्धत कांदा बराच काळ वापरण्यासाठी, त्यांना योग्य प्रकारे साठवणे महत्वाचे आहे. कांदे नेहमी बटाट्यापासून वेगळ्या, गडद, थंड आणि हवेशीर ठिकाणी ठेवावे.

कांदा आरोग्यासाठी फायदेशीर असला तरी अति प्रमाणात किंवा चुकीच्या पद्धतीने कांदा खाल्ल्यास काही नुकसान होऊ शकते. प्रत्येक व्यक्तीची शरीर प्रकृती वेगळी असल्याने कांद्याचा परिणामही वेगवेगळा दिसून येतो. कांदा जास्त प्रमाणात खाल्ल्यास आम्लपित्त, छातीत जळजळ, पोटदुखी आणि गॅस होऊ शकतो. विशेषतः कच्चा कांदा जड असल्याने पचनसंस्थेवर ताण येतो. ज्यांना गॅस, ॲसिडिटी किंवा अल्सरचा त्रास आहे त्यांनी कच्चा कांदा टाळावा.कांद्यामुळे काही लोकांना तोंडाला दुर्गंधी येते. यातील सल्फर घटकांमुळे श्वासात वास निर्माण होतो, जो बराच वेळ टिकू शकतो. तसेच कांदा खाल्ल्यानंतर काहींना डोकेदुखी किंवा चक्कर येण्याचा त्रासही जाणवतो. कांदा रक्त पातळ करतो, त्यामुळे ज्यांना शस्त्रक्रिया होणार आहे किंवा रक्तस्रावाचा त्रास आहे त्यांनी कांदा जास्त प्रमाणात खाणे टाळावे. काही लोकांना कांद्याची ॲलर्जी असू शकते, ज्यामुळे त्वचेवर खाज, पुरळ किंवा श्वसनास त्रास निर्माण होतो. गर्भवती महिला आणि लहान मुलांनी कांदा मर्यादित प्रमाणातच खावा, कारण जास्त कांदा पोटाशी संबंधित त्रास वाढवू शकतो. रात्री उशिरा कांदा खाल्ल्यास अपचन व झोपेचा त्रास होण्याची शक्यता असते. म्हणूनच, कांदा हा गुणकारी असला तरी समतोल आणि शरीराच्या गरजेनुसार सेवन केल्यासच तो लाभदायक ठरतो. अति कोणतीही गोष्ट नुकसानकारक ठरू शकते, हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे.

# हिवाळ्यात कोलेस्टॉलच्या पातळीमध्ये वाढ का होते?

हिवाळा ऋतू येताच शरीराची अधिक काळजी घेण्याची गरज असते. थंड दिवसांत, लोकांची आरोग्याची दिनचर्या बर्याचदा बदलते, ज्यामुळे आरोग्याच्या अनेक समस्यांचा धोका वाढतो. यापैकी एक म्हणजे कोलेस्टेरॉलच्या पातळीत वाढ, जे हृदयाच्या आरोग्यासाठी चिंतेचे कारण असू शकते. थंड हवामानात खाणे, दिनचर्या आणि शरीराच्या कार्य प्रक्रियेत बदल होतात, ज्याचा परिणाम शरीराच्या आरोग्यावर होतो. अशा परिस्थितीत हिवाळ्यात कोलेस्टेरॉलचा धोका वाढतो. हिवाळ्यात कोलेस्टेरॉल वाढल्याने कोणती लक्षणे दिसतात हे जाणून घेऊया. हिवाळ्यात कोलेस्टेरॉल वाढले की शरीर अनेक चिन्हे देते. यात थकवा, छातीत जडपणा जाणवणे, शरीरात कडकपणा किंवा सुस्तपणा वाढणे आणि सौम्य श्वासोच्छवासाचा समावेश आहे.

अनेक लोकांना व्यायाम केल्यानंतर किंवा थोडे कष्ट केल्यानंतर लवकर थकवा जाणवू लागतो. काही प्रकरणांमध्ये, पाय दुखणे, मान किंवा खांद्यांमध्ये कडकपणा आणि डोके जडपणा अनुभवू शकतो. ही चिन्हे सूचित करतात की शरीरात चरबी आणि कोलेस्टेरॉलची पातळी वाढत आहे, जी वेळेत नियंत्रित करणे आवश्यक आहे. आता जाणून घेऊया हिवाळ्यात असा धोका का वाढतो. कोलेस्ट्रॉल नियंत्रणात ठेवणे हे हृदयाच्या आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. यासाठी जीवनशैलीत काही सोप्या पण प्रभावी सवयी अंगीकारणे गरजेचे आहे. सर्वप्रथम आहारावर लक्ष द्या. तुप, लोणी, तळलेले पदार्थ, फास्ट फूड आणि जास्त तेलकट व प्रक्रिया केलेले अन्न टाळा. त्याऐवजी हिरव्या भाज्या, फळे, संपूर्ण धान्ये, ओट्स, डाळी आणि फायबरयुक्त आहार घ्या. अक्रोड, बदाम, जवस व ओमेगा-३युक्त पदार्थ उपयुक्त ठरतात. दररोज किमान ३० मिनिटे चालणे, योग किंवा व्यायाम



केल्यास वाईट (LDL) कोलेस्ट्रॉल कमी होते आणि चांगले (HDL) कोलेस्ट्रॉल वाढते. वजन नियंत्रणात ठेवणेही आवश्यक आहे. धूम्रपान आणि मद्यसेवन टाळावे. तसेच तणाव कमी करा, पुरेशी झोप घ्या. वेळोवेळी रक्ततपासणी करून डॉक्टरांचा सल्ला घ्या. शिस्तबद्ध जीवनशैली ठेवली तर कोलेस्ट्रॉल निश्चितच नियंत्रणात राहू शकतो. हिवाळ्यात कॉलेस्ट्रॉल वाढण्याची शक्यता अनेक कारणांमुळे वाढते . थंडीत, शरीर ऊर्जा वाचविण्याचा प्रयत्न करते, ज्यामुळे चयापचय कमी होते आणि चरबी बर्न कमी होते. याशिवाय सर्दीमुळे लोक हालचाल कमी करतात आणि व्यायामही कमी करतात, ज्यामुळे शरीरात चरबी जमा होऊ लागते. हिवाळ्यात तळलेले, गोड आणि जड पदार्थ यासारखे उच्च कॅलरी असलेले पदार्थ जास्त खाल्ले जातात, ज्यामुळे कोलेस्टेरॉल वाढते. तसेच, थंड हवामानात हार्मोनल बदल होतात, ज्यामुळे यकृतामध्ये कोलेस्टेरॉल तयार होण्याची प्रक्रिया वेगवान होऊ शकते. सूर्यप्रकाशाच्या कमतरतेमुळे व्हिटॅमिन डी कमी होते, ज्यामुळे कोलेस्टेरॉलच्या संतुलनावर परिणाम होतो. हिवाळ्यात कोलेस्टेरॉल नियंत्रणात ठेवण्यासाठी हलके, पौष्टिक आणि फायबरयुक्त अन्न घेणे आवश्यक आहे. आहारात ओट्स, ओटचे जाडे भरडे पीठ आणि मल्टीग्रेन तृणधान्यांचा समावेश करा, कारण ते खराब कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करतात.

बदाम आणि अक्रोड सारख्या नट्समध्ये निरोगी चरबी असतात आणि हृदयाचे आरोग्य मजबूत करतात. फ्लॅक्ससीड्स, चिया आणि भोपळा बियाण्यांमध्ये ओमेगा -३ समृद्ध असतात, जे हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर असतात. हिरव्या भाज्या आणि फळे शरीराला अँटीऑक्सिडंट्स देतात आणि यकृताचे कार्य सुधारतात. ऑलिव्ह किंवा मोहरीचे तेल तेलात एक चांगला पर्याय असू शकतो.

हिवाळ्यात या गोष्टी लक्षात ठेवा

दररोज किमान ३० मिनिटे चाला किंवा हलका व्यायाम करा.

पुरेसे पाणी प्या जेणेकरून चयापचय सक्रिय राहील.

तळलेले आणि गोड कमी खावे.

तणाव व्यवस्थापनावर लक्ष केंद्रित करा.

वेळोवेळी आपल्या कोलेस्टरॉलची पातळी तपासून घ्या.

## मोड (तळोदा) येथे भव्य शिवमहापुराण कथेला उत्साहात सुरुवात!

# भागवताचार्य सिध्देश्वरी दीदींच्या मुखातून शिवतत्त्वज्ञानाचे श्रवण; भक्तीमय वातावरणात भाविक तल्लीन

**नंदुरबार । दिपक गोसावी**

तळोदा तालुक्यातील मोड येथे समस्त ग्रामस्थांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सात दिवसीय भव्य शिवमहापुराण कथेला दिनांक ७ डिसेंबर २०२५, रविवार रोजी 'कलश यात्रे'ने मंगलमय वातावरणात उत्साहात सुरुवात झाली आहे. चैतन्यश्वर महादेव मंदिर चौक येथे आयोजित केलेली ही कथा ७ डिसेंबर ते १३ डिसेंबर २०२५ या कालावधीत चालणार असून, गेल्या पाच दिवसांपासून परिसरातील श्रद्धाळू आणि भाविक मोठ्या संख्येने कथेच्या श्रवणाला उपस्थिती लावत आहेत.

या शिवमहापुराण कथेसाठी कथा व्यासपीठावर परम पूजनीय भागवताचार्य सिध्देश्वरी दीदी (उमर्दे बुद्रुक, नंदुरबार) यांचे मार्गदर्शन लाभत आहे. दररोज दुपारी २ ते ५ वाजेपर्यंत दीदींच्या वाणीतून शिवकथेचा अमृतवर्षाव होत आहे.

रविवार, ७ डिसेंबर रोजी कथेचा प्रारंभ होण्यापूर्वी गावात भव्य कलश यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या यात्रेत महिलांची लक्षणीय उपस्थिती होती. यात्रेदरम्यान 'बम बम भोले' आणि 'हर हर महादेव'च्या जयघोषाने संपूर्ण मोड गाव दुमदुमले होते. त्यानंतर व्यासपीठावर कलशाची स्थापना करून दीदींच्या वाणीतून शिवमहापुराणाच्या मंगलमय अध्यायांचे वाचन सुरू झाले.

कथा व्यास सिध्देश्वरी दीदी आपल्या रसाळ वाणीतून श्रोत्यांना भगवान शंकराचे माहात्म्य, विविध शिवलीला आणि शिवतत्त्वज्ञान समजावून सांगत आहेत. शिवमहापुराणातील प्रसंग ऐकण्यासाठी भाविक मोठ्या संख्येने उपस्थिती लावत आहेत.



कथा मंडपात शिवकथेसोबत विविध भजनांचाही रसिकांना लाभ होत आहे. हजारो भाविक दीदींच्या भजनांच्या साथीने भक्तीरसात तल्लीन झाले आहेत.

डम डम डमरू बाजे कैलाशात,
भोलेनाथ माझा जगी नांदतो!
हर हर महादेव, जय जय शिव शंभू,
भक्तीचा सागर मोड गावी वाहतो!
महादेवाचे नाम घ्या हो, संकटे जातील दूर,
मन शांत होईल तुमचे, मिळेल आत्म्याचा नूर!

ग्रामस्थांची एकजूट

या कथेचे यशस्वी आयोजन सर्व ग्रामस्थ मंडळ मोड यांनी केले आहे. मोड येथील ग्रामस्थ दरवर्षी चैतन्येश्वर महादेव मंदिराच्या परिसरात अनेक धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करून एकतेचे दर्शन घडवतात. त्यांचे हे एकत्र येणे आणि कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करणे हे आध्यात्मिक दृष्टिकोनातून आदर्श घेण्याजोगे असल्याची भावना परिसरामध्ये व्यक्त होत आहे.

सर्व ग्रामस्थ मंडळाने परिसरातील सर्व धर्मप्रेमी बंधू-भगिनींना या शिवकथा श्रवणाचा लाभ घेण्याचे विनम्र आवाहन केले आहे. ही कथा शनिवार, १३ डिसेंबर २०२५ पर्यंत सुरू राहणार आहे.

# सागवान लाकडाची अवैध वाहतूक, वन विभागाने २७,७८१ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला; ३४ नगांसह २ साग चौपट हस्तगत!

दैनिक वादळ वार्ता

**रवींद्र वळवी । मोलगी**

बिलगाव वनक्षेत्रातील भुषा परिमंडळातील नियतक्षेत्र - सावऱ्या कंपार्टमेंट क्रमांक ७६ या जंगलभागात वन विभागाने गुप्त बातमीच्या आधारे मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत अवैधपणे तोडलेले सागवान लाकूड (साग दांड्या आणि साग बेलके) असा एकूण सत्तावीस हजार सातशे एक्क्याऐंशी रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



मिळालेल्या माहितीनुसार, बिलगाव रेंज स्टाफसह वनकर्मचारी फिरती करत असताना जंगल भागात ठिकठिकाणी लपवून ठेवलेले साग दांड्याचे २८ नग आणि साग बेलक्याचे ६ नग असे एकूण ३४ नग आढळून आले. याचे घनमीटर प्रमाण १.०९८ असून त्याची किंमत चोवीस हजार चारशे एक्काचाळीस रुपये आहे. तसेच, साग चौपटीचे २ नग (घनमीटर ०.१५, किंमत तीन हजार तीनशे चाळीस रुपये) देखील जप्त करण्यात आले.

जप्त केलेला हा संपूर्ण मुद्देमाल वन कर्मचाऱ्यांनी सुमारे ३ किलोमीटर पायपीट करून शिरओझ्याने रस्त्यावर आणला. त्यानंतर शासकीय व खाजगी वाहनाने तो धडगाव टिंबर डेपोवर आणून पावतीने जमा करण्यात आला.

वनपाल भुषा यांनी सदर गुन्ह्याबाबत वनगुन्हा क्रमांक ०५/२०२५ भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम २६(१) ड, इ, फ अन्वये नोंदविला आहे.

वनसंरक्षक धुळे निनु सोमराज, उपवनसंरक्षक नंदुरबार वनविभाग संतोष सस्ते, विभागीय वनाधिकारी दक्षता विभाग धुळे राजेंद्र सदगीर आणि सहाय्यक वनसंरक्षक अक्राणी एस.डी. साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली. सदर कारवाई वनक्षेत्रपाल बिलगांव चारुशीला काटे यांच्या नेतृत्वाखाली वनक्षेत्रपाल प्रथमेश ढाणे, वनपाल भुषा. भरतसिंग परदेशी, वनपाल बिलगाव सुषमा पवार, वनपाल माळ प्रतिभा बोरसे यांच्यासह वनरक्षक मंगेश वळवी, हिम्मत तडवी, पूनम पावरा, ज्योती पावरा, दिलवर पावरा, गिरधर पावरा, दिनेश वसावे, प्रमिला पावरा आणि वाहन चालक योगेश साळवे यांनी यशस्वीरित्या पार पाडली. पुढील तपास वनपाल भूषा,भरतसिंग परदेशी हे करीत आहेत.

# मध्य रेल्वेच्या वरिष्ठ अधिकार्यांचे सय्यद हनिफ उर्फ बहादूरभाई यांनी परळीत केले स्वागत



दैनिक वादळ वार्ता

**परळी (प्रतिनिधी)**

परळी-बीड-नगर रेल्वे मार्गा पैकी बीड ते वडवणी मार्गावरील रेल्वे चाचणीसाठी परळी शहरात आलेल्या मध्य रेल्वे विभागाच्या अधिकार्यांचे परळी येथे सय्यद इस्माईल फर्मच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते सय्यद हनिफ उर्फ बहादूरभाई यांनी स्वागत केले.परळी-बीड-नगर रेल्वे मार्गापैकी बीड ते वडवणी रेल्वे मार्गावर दि.१० व ११ डिसेंबर रोजी चाचणी घेण्यात आली.यानिमित्त रेल्वेच्या मध्य विभागाचे चिफ इंजिनिअर मनोज अरोरा,सीएओ अविनाश कुमार पांडे,सीई ब्रिजेश कुमार,अहिल्यानगर बीड रेल्वे मार्गाचे उपमुख्य अभियंता डी.डी.लोळगे आदी अधिकारी हे दि.१० डिसेंबर रोजी परळी येथे आल्यानंतर प्रभु वैद्यनाथाचे दर्शन घेतले.यानंतर परळी येथील अतिथी विश्रामगृहात बहादुरभाई यांनी त्यांचा सत्कार केला यावेळी अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# बीड जिल्ह्यातील विस्तार अधिकाऱ्यांच्या बदल्या रखडल्या पँथर सेनेची भ्रष्टाचाराच्या संशयाने चौकशीची मागणी- नितीन सोनवणे

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील पंचायत समित्यांमधील शिक्षण आणि पंचायत विभागातील विस्तार अधिकाऱ्यांच्या १० आणि २० वर्षांच्या सेवाकालानंतरही बदल्या न होण्याबाबत ऑल इंडिया पँथर सेनेने तीव्र तक्रार केली आहे. या अधिकाऱ्यांच्या वैयक्तिक आर्थिक हितसंबंध आणि मालमत्तेची सखोल तपासणी करण्याची मागणी करत, संबंधितांना पदावरून बाजूला ठेवण्याची आणि चौकशी अहवाल सार्वजनिक करण्याचीही मागणी करण्यात आली आहे. अन्यथा धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने आज जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांना निवेदन देण्यात आले. याची प्रत विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनाही पाठवण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, बीड जिल्ह्यातील पंचायत समित्यांमध्ये शिक्षण विस्तार अधिकारी (एर्वीलरींळेप एींशपीळेप जषषळलशी) आणि पंचायत विस्तार अधिकारी (झरपलहरूरीं एींशपीळेप जषषळलशी) यांच्या १० आणि २० वर्षांच्या सेवाकालानंतरही नियमित बदल्या झालेल्या नाहीत. इतर विभागातील अधिकारी-



कर्मचाऱ्यांच्या बदल्या नियमाप्रमाणे होत असताना, या अधिकाऱ्यांना मात्र वगळण्यात येत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.ही बाब अत्यंत संशयास्पद आणि नियमबाह्य आहे. दीर्घकाळ एकाच ठिकाणी कार्यरत राहिल्यामुळे या अधिकाऱ्यांचे स्थानिक गट, ठेकेदार आणि इतर हितसंबंधित व्यक्तींशी वैयक्तिक आर्थिक संबंध प्रस्थापित झाल्याची शंका आहे, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यामुळे पंचायत आणि शिक्षण विभागातील कामकाजाच्या पारदर्शकतेला बाधा पोहोचत असून, भ्रष्टाचाराला संरक्षण मिळत असल्याचा ठोस संशय निर्माण झाल्याचेही सांगण्यात आले आहे. ऑल इंडिया पँथर सेनेने मागणी केली आहे की, या अधिकाऱ्यांच्या वैयक्तिक, कुटुंबीय आणि नातलगांच्या नावावर असलेली मालमत्ता, उत्पन्न-खर्च तपशील, बँक खात्यांची चौकशी आणि सेवा-पदाशी संबंधित लाभांच्या देवाणघेवाणीची माहिती याची स्वतंत्र तपासणी समितीमार्फत तात्काळ चौकशी करण्यात यावी. तसेच, त्यांच्या १० आणि २० वर्षांच्या सेवाकालानंतर बदल्या तात्काळ करण्याचे आदेश निर्गमित करण्यात यावेत. चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांना पदावरून बाजूला ठेवण्यात यावे, जेणेकरून चौकशीवर कोणताही प्रभाव पडणार नाही. चौकशी अहवाल सार्वजनिक करून दोषींवर कडक प्रशासकीय आणि दंडात्मक कारवाई करण्याचीही मागणी करण्यात आली आहे.निवेदन देणाऱ्यांमध्ये महाराष्ट्र प्रवक्ता तथा बीड जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे आणि ऑल इंडिया पँथर सेनेचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होते. प्रशासनाने या तक्रारीची दखल घ्यावी, अन्यथा धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा सोनवणे यांनी दिला आहे.या तक्रारीमुळे बीड जिल्ह्यातील प्रशासकीय यंत्रणेत खळबळ उडाली असून, अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर आता चर्चा सुरू झाली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अद्याप या निवेदनावर कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही.

## अनुकंपा तत्त्वावर सेवेत घेण्यास टाळाटाळ

# केज पंचायतसमिती कार्यालया समोर वाघमारे कुटुंबाचे बेमुदत उपोषण!

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील विडा येथील अनुकंपा तत्त्वावर सेवेत घेण्यास केज तालुक्यातील विडा ग्रामपंचायतचे सरपंच सातत्याने टाळाटाळ करत असल्याच्या निषेधार्थ एका महिलेने पंचायत समिती कार्यालयासमोर बेमुदत उपोषणाचीनोटीस दिली आहे.उपोषणकर्त्या सौ.अंजली संतोषवाघमारे या दिनांक १० डिसेंबर २०२५ बुधवार पासून आपल्या कुटुंबियांसमवेत बेमुदत उपोषणास बसलेल्या आहेत. सौ.अंजली संतोष वाघमारे मु.पो.विडा,ता. केज,जि.बीड येथील रहिवासी आहेत.त्यांच्या कुटुंबाला त्यांच्या मयत सासूच्या जागेवर अनुकंपा तत्त्वावर सेवेत घ्यावे,अशी त्यांची मागणी आहे. यापूर्वी मा.सरपंच यांनी कुटुंबातील सागर दादाराव वाघमारे यांना घेणार नाही,मात्र त्यांच्या ऐवजी सौ.अंजली संतोष वाघमारे यांना मयत सासूच्या जागेवर अनुकंपा तत्त्वावर घेतो असे सांगितले होते.सरपंचांच्या सूचनेनुसार,कुटुंबाने वारसा बाबतचे संमतीपत्र देखील ग्रामपंचायतकडे



सादर केले आहे. अर्जदाराने गटविकास अधिकारी,पंचायतसमिती,केज यांना दिलेल्या उपोषण नोटीसीमध्ये त्यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.१२३९ दि.१३ मे२०२५ आणि शासन निर्णय दि. ०२/०५/२०२५ चा संदर्भ दिला आहे.अर्जदाराच्या म्हणण्यानुसार,ग्राम पंचायत कर्मचारी हा अल्पवेतनी असल्यामुळे त्याच्या कुटुंबाला आधार मिळावा यासाठी अनुकंपा तत्त्वाचे शासन निर्णय पारित करण्यात आले आहेत.मात्र,विडा गावचे सरपंच साहेब या शासन निर्णयाची पायमल्ली करत आहेत आणि अंमलबजावणी करण्यास टाळाटाळ करत आहेत.आर्थिक परिस्थितीनाजूक अर्जदार अनुसूचित जाती पैकी असून, त्यांची आर्थिक परिस्थितीही नाजूक आहे.त्यामुळे सदर शासन निर्णयाच्या अंमल बजावणीसाठी आणि आपल्या कुटुंबाला न्याय मिळण्यासाठी त्यांनी पंचायत समिती,केज कार्यालयासमोर बेमुदत उपोषणास बसण्याचा निर्णय घेतला आहे. अर्जदार सौ.अंजली संतोष वाघमारे यांनी आपल्या निवेदनाची प्रत माहितीस्तव पुढील कार्यालयांना सादर केली आहेत.मा.मुख्यकार्यकारी अधिकारी,जि.प.बीड,मा. सरपंच/ग्रामसेवक,ग्रा.पं. कार्यालय,विडा ता.केज, मा.पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन,केज,मा. नामदेव चव्हाण, चिटणीस,म.रा.ग्राम पंचायत कर्मचारी महासंघ यांना दिले आहे.

# मोलगीत सोंगाड्या पार्टीचे कार्यक्रम जोमात होणार

दैनिक वादळ वार्ता

**मोलगी (रविंद्र वळवी )**

अक्कलकुवा तालुक्यातील मोलगी येथे होणारी गाव दिवाळी दरवर्षा प्रमाणेच या वर्षाची गाव दिवाळी ४ व ५ जानेवारी २०२६ रोजी मोलगी गावातील पाटील पाड्यात होणार आहे.याचे नियोजन मोलगी गावाच्या गांव बैठकीत करण्यात आले. गाव दिवाळी हा आदिवासी लोकांचा सांस्कृतिक उत्सव असून त्याला सांस्कृतिक वारसा आहे.त्यामुळे डिसेंबर ते जानेवारीत दरम्यान सातपुड्यातील प्रत्येक गावात गाव दिवाळीची पूजा केली जाते. नंदुरबार जिल्ह्याच्या सातपुड्याच्या तिसऱ्या आणि चौथ्या पर्वतरांगांमध्ये वसलेले डाब हे गाव.आदिवासी संस्कृतीचे उगम स्थान म्हणून सर्व दूर हा परिसर परिचित आहे.या परिसरात आदिवासींचे समाज दैवत म्हणून राजा पांठा,गांडा ठाकूर,देव मोगरा माता यांच्यापासून तर त्यांचे अतिशय महत्त्वाचे सण असलेली होळी आणि दिवाळीचा संबंधही डाब गावाशी जोडला गेला आहे. आदिवासी समाजाचे दैवत राजा पांठा त्याचबरोबर गांडा ठाकूर यांच्यामुळे गाव दिवाळीचा सण खऱ्या अर्थाने सुरू झाल्याची कथा सर्व दूर परिचित आहे.राजा पांठा व गांडा ठाकूर आपल्या राज्याचा फेरफटका मारायला निघाले होते.त्यावेळेस रात्री मुक्कामाला ते प्रवासात ज्या ज्या



ठिकाणी थांबले त्या त्या ठिकाणी आनंद उत्सव साजरा केला जात असे त्यालाच 'गाव दिवाळी' म्हणण्याची परंपरा पुढे येऊन सुरू झाली.एकदा एका गावात त्या दोघांच्या उपस्थितीत नरबळी दिला जात होता तेव्हा हा मान आम्हाला द्यावा अशी विनंती दोघांनी केली व त्यातून या दोघांनी वृद्धांची सुटका करत त्याचे प्राण वाचले होते व यापुढे रेड्याचा बळी द्यावा असे फर्मान काढले व नरबळीची परंपरा थांबवली होती.आज ही अनेक अनेक ठिकाणी रेड्याचा बळी दिला जातो.

गाव दिवाळी उत्सवात गावातील नागरिकांच्या मनोरंजनासाठी सोंगाड्या पार्टी बोलावली जाते ती पार्टी रात्रभर आदिवासी गीते त्याच बरोबर नृत्य,नाटकावर आधारित आपली कला संस्कृती या ठिकाणी सादर करीत असते.या गाव दिवाळीच्या उत्सवात आदिवासींच्या कला,संस्कृतीला मोठे महत्त्व असते हा उत्सव पाहण्यासाठी परिसरातील मोठ्या संख्येने जमत असतात त्यामुळे ज्या गावात ही दिवाळी साजरी होते त्या गावाला यात्रेचे स्वरूप प्राप्त होत असते पूजा आणि सोंगाड्या पार्टी साठी लागणारा खर्च हा गावातील लोकांकडूनच गोळा केला जातो. व हा कार्यक्रम सादर होत असतो मनोरंजना बरोबर हे कलाकार आदिवासी समाजामध्ये जनजागृती,समाज प्रबोधन करत असतात त्यात अंधश्रद्धा निर्मूलन,समाजातील सामाजिक समस्या,आरोग्य, शिक्षण,बाल मजुरी इत्यादी साक्षरतेचे कार्यक्रम करत असतात.या गाव दिवाळीतून आदिवासी समाजापर्यंतच्या काही साक्षरतेच्या दृष्टीने कार्यक्रम पोहोचवायचे असतील तर शासनाकडून देखील या कलावंतांचा उपयोग केला जात असतो.मोलगी गावात होणाऱ्या गाव दिवाळीसाठी गावातील ज्येष्ठ नागरिक हे पंधरा दिवसांची पालनी करतात आणि पाच दिवसात दिवाळीची संस्कृतीक पूजा,पुजारी नुरजी वसावे,विज्या वसावे,दमण्या वळवी,काल्या वसावे यांच्या कडून केली जाते.त्याच प्रमाणे नोरंजन,आणि शेटच्या दिवशी तीवार करतात त्या दिवशी छान जेवण बनवून आपल्या नातेवाईक आणि समाजातील लोकांना जेवण दिले जाते सर्व ग्रामस्थ त्या दिवशी आनंदाने हा उत्सव साजरा करतात. मोलगी गाव दिवाळीत दिनांक ४ व ५ जानेवारी रोजी सोंगाड्या पार्टी राहणार असल्याचे नियोजन मोलगी ग्रामस्थांकडून करण्यात आले आहे.गाव दिवाळी नियोजन गावातील पोलीस पाटील ज्येष्ठ नागरिक यांच्या कडून करण्यात आले आहे.माजी पोलीस पाटील रतनसिंग वसावे,त्याच प्रमाणे रुपसिंग वसावे,मधुकर वसावे, बाजीराव पाडवी,चंद्रसिंग वसावे, सरदारसिंग वसावे,दामा वसावे, गजानन वसावे,दिलीप वसावे,भीमा तडवी,महेंद्र वसावे,कागड्या वसावे,सुरेश वसावे,काल्या वसावे,रामा गुरूजी,जालमा वसावे,इरमा वसावे यांच्या कडून हे नियोजन करण्यात आले आहे.मोलगी हे गाव बारा पाड्यांचे असल्याने सर्व पाड्यातील वरिष्ठ व्यक्तींचा नियोजनातून हा सास्कृतिक कार्यक्रम पार पाडला जातो.

# विष्णू घुलेंचे समाजकार्य मुंडे साहेबांच्या विचारांना अभिप्रेत-मा.खा.डॉ.प्रीतमताई मुंडे

## येवता येथे लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे उद्घाटन

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे यांनीआयुष्यभर तळागाळातील लोकांचा विचार केला.गरजूंनामदत करणे आणि समाजासाठी कार्य करणे हीच त्यांना खरी आदरांजली आहे. विष्णू घुले यांनी राबवलेले समाजकार्य हेच मुंडे साहेबांच्या विचारांना अभिप्रेत आहे,असे प्रतिपादन भाजप नेत्या माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे यांनी केले.



केज तालुक्यातील येवता येथे स्व.गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त गुरुवारी दि.११ डिसेंबर रोजी भाजपचे युवा नेते विष्णू भाऊ घुले यांच्या संकल्पनेतून रक्तदान शिबिर आणि शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला.यावेळी उद्घाटनपर भाषणात डॉ.प्रीतमताई मुंडे बोलत होत्या. कार्यक्रमापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास सामूहिक अभिवादन तसेच ग्राम देवतेचे दर्शन घेण्यात आले.डॉ.प्रीतमताई मुंडे पुढे म्हणाल्या की,स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या वर या भागातील लोकांनी नेहमीच प्रेम केले.त्यांनीही शेवटच्या घटकाचा विचार करून कार्य केले.त्यांच्या विचारांना अनुसरून त्यांच्या जयंती निमित्त जिल्ह्यातच नव्हे तर राज्य भरात विविध उपक्रम राबवले जातात.पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत हजारो कार्यकर्ते लोकाभिमुख कार्यक्रम राबवतात.विष्णू भाऊ घुले यांचा उपक्रमही तितकाच स्तुत्य असून, सभापतीपदाच्या कार्य काळात त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय आहे. कार्यक्रमाला भाजप नेते संतोष हंगे,माधवराव निर्मळ,माजी सभापती परिमलाताई घुले,संदीप पाटील,भगवान केदार, डॉ.वासुदेव नेहरकर, मुरलीधर ढाकणे,मधुर मुंडे,सुनील हिरवे,जयश्री गदळे यांच्यासह सर्व सरपंच,भाजप व मित्र पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक,सूत्र संचालन रमेश बिक्कड यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्विते साठी विष्णू भाऊ घुले यांच्यासह कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.तसेच येवता जिल्हा परिषद गटातील नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली.

### येवता गटातील सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये शैक्षणिक साहित्य वाटप करणार-विष्णू भाऊ घुले


**येवता जिल्हा परिषद गटातील अनेक तरुणांनी रक्तदान शिबिरात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.आजपासून येवता जिल्हा परिषद गटातील सर्व प्राथमिक शाळां मधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य दिले जाणार आहे,अशीमाहिती भाजपचे युवा नेते विष्णू घुले यांनी दिली.**

# डॉक्टरांवरच अन्याय का? खा.बजरंग सोनवणेंनी उठविला संसदेत आवाज

## आठ तासाची ड्यूटी देण्याबाबत मागणी

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**




देशातील पीजी रेसिडेंट डॉक्टरांना ३६ ते ४८ तास सलग,कोणत्याही विश्रांती शिवाय काम करायला लावले जात आहे.इतर क्षेत्रात आठ ते बारा तास काम करण्याचे नियम आहेत मग हा नियम डॉक्टरांनाच का लागू नाहीत ? हा सरळ सरळ अमानवी अत्याचार आहे, यामुळे डॉक्टरांच्या ड्यूटी च्या वेळेत बदल करावा, अशी आग्रही मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत मांडली.दिल्ली येथे सुरू असलेल्या संसदीय अधिवेशनात खा.बजरंग सोनवणे यांनी डॉक्टरांच्या ड्यूटीच्या वेळे बद्दलचा महत्वाचा मुद्दा उपस्थित केला.यावेळी बोलताना ते म्हणाले की, देशातील पीजी रेसिडेंट डॉक्टरांना ३६ ते ४८ तास सलग,कोणत्याही विश्रांती शिवाय काम करायला लावले जाते आहे.मुळात असे काम केल्यास डॉक्टरांवर ताण तणाव निर्माण होते.इतर क्षेत्रात आठ ते दहा तास कामाची वेळ आहे,मगडॉक्टरांनाच ३६ ते ४८ तास काम का करावे लागते.आरोग्य व्यवस्थेचे आधारस्तंभ असलेल्या डॉक्टरांवर असे क्रूर वेळापत्रक का?, झोपेचा अभाव,थकवा, सततचा ताण,या अवस्थेत रुग्णसेवा करणाऱ्या डॉक्टरांना आणि रुग्णांना दोघांनाही धोका निर्माण होतो.यामुळे सलग ३६ ते ४८ तासांच्या ड्यूटी तात्काळ बंद कराव्यात,८ तासांच्या मानवी आणि वैज्ञानिक कामाच्यामर्यादा लागू कराव्यात,हे कर्तव्य निष्ठेचे परीक्षण नाही तर हा अन्याय आहे,आणि तो आता थांबायलाच हवा. आपण सर्वांनी मिळून तरुण डॉक्टरांच्यापाठीशी आपण सर्वांनी उभे राहिले पाहिजे असेही खा.बजरंग सोनवणे म्हणाले.

# केज बायपास व बसडेपो साठी केज विकास संघर्ष समितीचे पुन्हा आंदोलन

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज येथे रिंग रोड बायपास किंवा उड्डाणपूल आणि केज येथे बसडेपो तात्काळ मंजूर करा या मागणीसाठी केज विकास संघर्ष समितीने पुन्हा एकदा आंदोलनाचापवित्रा घेतला असून नवीन वर्षात यामागणीसाठी आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा समितीच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांनी दिला आहे.समितीच्या वतीने केज विधानसभेच्या आमदार श्रीमती नमिताताई मुंदडा व केज तहसीलदार यांना निवेदनाच्या प्रती देऊन वरील दोन्ही प्रश्नावर शासन दरबारी कार्यवाही करण्यासाठी प्रयत्न करण्याची विनंती केली आहे.सध्या नागपूर येथे हिवाळी अधिवेशन सुरु असून आ.नमिताताईंनी केजवासियांचे हे महत्वाचे दोन प्रश्न अधिवेशनात मांडण्याचीही विनंती केली आहे.केज शहर सध्या खामगाव-पंढरपूर व अहमदपूर-अहमदनगर या महामार्गाच्या जोडणी वर आहे.वरील दोन्ही



महामार्ग वाहतूकीसाठी सुलभ व सोयीचे झाले असल्याने या वरील वाहतूक खूप पटीने वाढली आहे.यामध्ये

अवजड वाहनांची संख्या ही वाढली आहे. परिणामता केज शहर अंतर्गत भागात अपघातांची संख्याही वाढली आहे.शहरातील नागरिक,विद्यार्थी व वृद्धाना पायी चालणे अवघड झाले आहे. यासाठी आता केज शहरांतील अंतर्गत भागात रस्त्यालगत फुटपाथ बनवणे गरजेचे आहे व सततच्या होणाऱ्या वाहतूक कोंडीसाठी आता बायपास (रिंगरोड)अथवा उड्डाणपुल यापैकी जे सोयीचे व फायद्याचे आहे ते मंजूर करून तयार करावे.याशिवाय केज शहरात अत्यंत मोक्याच्या ठिकाणी बीड रोड लगत बसडेपो साठी साडेसात एकर जमीन आरक्षित केलेली आहे.याठिकाणी बसडेपो मंजूर करून सुरु करावा अशी समितीची केज वासियांच्या वतीने अनेक दिवसापासून मागणी आहे.शासनाच्या नवीन धोरणानुसार इलेक्ट्रिक चार्जींग सेंटर व ई बसडेपो सुरु करणेही सोयीचे आहे.यासाठीही समिती सतत पाठपुरावा करत आहे.तरी याबाबत आमदार महोदया व शासनाने तात्काळ कार्यवाही करावी अशी समितीने मागणी केली आहे.याबाबत निवेदनाच्या प्रती आमदार नमिताताई मुंदडा व केज तहसीलदार यांना देण्यात आल्या आहेत.निवेदनावर हनुमंत भोसले,नासेर मुंडे, शेषराव घोरपडे व इंजिनियर मोहनराव कराड यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# समतेच्या लढ्यास नवी उर्जाभरणी-केजमध्ये १४ डिसेंबरला समता सैनिकदलाचे भव्य प्रशिक्षण शिबिर

## आंबेडकरी तरुणाईला संघटित, शिस्तबद्ध आणि संविधाननिष्ठ करण्यासाठी ऐतिहासिक पाऊल

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

समता,स्वातंत्र्य,न्याय आणि बंधुता या मूल्यांची जपणूक करणाऱ्या बदलाच्या सैनिकांची नवीन पिढी घडविण्या साठी भारतीय बौद्ध महासभा,शहर शाखा केज तर्फे समता सैनिक प्रशिक्षण शिबिराची तयारी वेगात सुरु झाली आहे.रविवार दि.१४ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित या भव्य शिबिरासाठी शहरातील तसेच परिसरातील बौद्ध अनुयायांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. संविधान के सन्मान में, समता सैनिक दल मैदान में सह सुरु झालेल्या या अभियानाचा उद्देश तरुणाईत संविधानिक मूल्यांची जाणीव,शिस्त, संघटन कौशल्य आणि सामाजिक चळवळीचे भान दृढ करणे हा आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या समता सैनिक दलाचे कार्य फक्त संघटनापुरते मर्यादित नसून,सामाजिकसमानता आणि बंधुभावावर आधारित प्रबुद्ध भारत घडविण्याचा त्यामागचा मूलाधार आहे.या शिबिरात तरुणांना संविधानिक तत्त्वांची ओळख,नेतृत्व कौशल्य, सामाजिक प्रश्नांची जाण आणि शिस्तबद्ध संघटन कार्याची प्रत्यक्ष शिकवण दिली जाणार आहे.आयोजकांच्या मते,१८ वर्षांवरील सर्व युवक युवतींनी समता सैनिक दलाच्या सदस्यत्वासह या शिबिरात सहभागी होऊन परिवर्तन यात्रेचा भाग व्हावे.शिबिराच्या आयोजनासाठी शहर शाखेकडून मोठे संपर्क पथक जाहीर करण्यात आले आहे.त्यामध्ये आयु. जयपाल मस्के शहराध्यक्ष (मो.८९८३१४९९४९), आयु.शिवकुमार मस्के शहर सरचिटणीस (मो. ९४२३१७०५९१),आयु. चंद्रकांत मस्के (नाना) कोषाध्यक्ष (मो. ७५५९२४३६३३),आयु. महेंद्र मस्के संस्कार उपाध्यक्ष (मो. ९९७०६६३०३७),डॉ. प्रभाकर ठोके माजी शहराध्यक्ष,आयु. नंदकुमार मस्के माजी तालुकाध्यक्ष तसेच प्रा. धनराज भालेराव,प्रा.डॉ. बी.जे.हिरवे,अजय गालफाडे,अक्षय हजारे, प्रमोद मस्के आदींसह एक मोठा स्वयंसेवक वर्ग कार्यरत आहे.ही सर्व नावे आयोजक मंडळातील सक्रिय पदाधिकारी असल्याने नोंदणी व माहिती देण्यासाठी संपूर्ण शहरभर कार्यरत राहणार आहेत.सध्याच्या सामाजिक,सांस्कृतिक आणि संविधानिक वातावरणात आंबेडकरी विचारांचे संरक्षण आणि प्रसार करण्यासाठी सुसंघटित व सजग तरुणाईची आवश्यकता प्रकर्षाने जाणवते.या पार्श्वभूमीवर केज मधील हे शिबिर केवळ एक कार्यक्रम नसून समता, न्याय आणि बंधुतेच्या समाजरचनेची नवी सुरुवात म्हणून पाहिले जात आहे.या कार्यक्रमाचे

ठिकाण नालंदा विद्यालय, फुलेनगर,केज येथे रविवार दि.१४ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजल्या पासून सुरुवात होणार आहे.

# कोलंबी मध्ये लोकसहभागातुन उभारला वनराई बंधारा




दैनिक वादळ वार्ता

**नायगांव । हनुमंत चंदनकर**

तालुक्यातील कोलंबी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत लोकसहभाग, श्रमदान व सामाजिक उत्तरदायित्वच्या माध्यमातून गावालगतच्या ओढ्याजवळ पाणी साठवणूकिसाठी वनराई बंधाऱ्याची उभारणी करण्यात आली. वनराई बंधारा हा बंधाऱ्याच्या बांधकामाचा एक कच्चा प्रकार आहे. वनराई बंधारा हा एक नैतिक आणि पर्यावरणीय उपाय आहे. ज्याच्या माध्यमातून पाणी संचयन आणि मृद संधारन साधता येते. यामुळे पाणी प्रश्नाचा सामना करण्यास मदत होते. पाणी वाचवा, पाणी साठवा या संकल्पनेतून गावाकऱ्यांकडून उत्स्फूर्तपणे वनराई बंधारा उभारण्यात आला. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत कोलंबी येथे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यामध्ये लोकसहभागातून वनराई बंधारा उभारला हे विशेष. यावेळी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, तलाठी, कृषी सहायक, गावातील सर्व विभागाचे कर्मचारी, नागरिक, महिला - पुरुष यांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

# सुनीता मरसकोल्हे यांच्या 'बेकायदेशीर' अटकेविरोधात विकास अधिकाऱ्यांचे बेमुदत कामबंद आंदोलन सुरूच

दैनिक वादळ वार्ता

**पालघर । प्रतिनिधी**

पंचायत समिती आर्वी (जि. वर्धा) येथील गटविकास अधिकारी सुनीता मरसकोल्हे यांना मनरेगा मधील कथित अपहार प्रकरणात कायदेशीर प्रक्रिया न पाळता अटक करण्यात आल्याने महाराष्ट्र विकास सेवा संघटनेसह राज्यातील अधिकारी वर्गामध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. या अटकेचा निषेधार्थ पालघर जिल्हा परिषदेतील विकास अधिकाऱ्यांनी ४ आणि ५ डिसेंबर रोजी सामूहिक रजेद्वारे कामकाज बंद ठेवले होते. तथापि, शासनाकडून कोणतीही ठोस भूमिका न घेतल्याने अधिकारी वर्ग आता अधिक आक्रमक झाला असून आज ८ डिसेंबरपासून बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले आहे.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रविंद्र शिंदे,प्रकल्प संचालिका डॉ.रूपाली सातपुते,उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा) इजाज अहमद शरीकमसलत, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं) अशोक पाटील,उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मनरेगा) अतुल पारसकर सर्व गटविकास अधिकारी,सहायक गटविकास अधिकारी या आंदोलनात सहभागी झाले आहेत.अधिकारी वर्गाचे म्हणणे आहे की मरसकोल्हे यांच्यावरील कारवाई न्यायालयीन आणि प्रशासकीय प्रक्रियेला धरून नाही. मनरेगा योजनांमधील डेटा एन्ट्रीपासून एनपीसीआय मॅपिंगपर्यंतची तांत्रिक कामे कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून केली जातात, तर डीएसी ही गटविकास अधिकाऱ्यांची केवळ अंतिम तांत्रिक प्रक्रिया असते. या प्रक्रियेच्या आधारावरच अधिकाऱ्याला गुन्हेगार ठरवणे हा स्पष्ट अन्याय आणि अधिकारी वर्गाला लक्ष्य करण्याचा प्रयत्न आहे,असा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे.या लढ्यात ग्रामसेवक संघटना, विस्तार अधिकारी संघटना आणि लिपिक संवर्गीय संघटना यांनीही खुले समर्थन दिल्याने आंदोलनाचा विस्तार अधिक तीव्र होणार असल्याचे संकेत आहेत. महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियनचे राज्य सरचिटणीस सुचित घरत, महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी युनियन चे पालघर जिल्हा अध्यक्ष सुनील अहिरे, विस्तार अधिकारी पंचायत संघटनेचे पालघर जिल्हा अध्यक्ष राजू कोळी, पालघर जिल्हा जिल्हा परिषद कर्मचारी महासंघ सरचिटणीस

नितीन पवार यांनी अधिकाऱ्यांसोबत सदर संघटनांनी देखील आंदोलनस्थळी उपस्थित राहून मरसकोल्हे यांच्या अटकेविरोधात निषेध करून आंदोलनाला पाठिंबा दिला. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रविंद्र शिंदे तसेच उपस्थित सर्व अधिकारी यांनी याबाबत ठाम भूमिका मांडताना सांगितले की गटविकास अधिकाऱ्यांविरुद्ध झालेल्या कारवाईत कायद्याची मूलभूत प्रक्रिया पाळली गेली नाही. डीएससी वापर हा अंतिम तांत्रिक टप्पा आहे; त्यावरून अधिकाऱ्यांना थेट गुन्हेगार ठरवणे अन्यायकारक आहे. आम्ही शासनाकडून तटस्थ, न्याय्य आणि अधिकारी सन्मान जपणारा निर्णय अपेक्षित आहोत. ५ डिसेंबरपर्यंत मागण्यांवर तोडगा न निघाल्याने आजपासून बेमुदत संपाचा निर्णय घेण्यात आला असून, मनरेगा,पंचायत,घरकुल तसेच इतर विभागातील अनेक महत्त्वाच्या कामांवर याचा थेट परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अधिकारी वर्गाने शासनाला तातडीने हस्तक्षेप करून परिस्थिती सुरळीत करण्याचे आवाहन केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077